# प्रकरण ४ थे

## *अंगणवाडी शिक्षणाची तात्विक व मानसशास्त्रीय बैठक*

| | |
|---|---|
| ४.१ | अंगणवाडी शिक्षण व मानसशास्त्र. |
| ४.२ | अंगणवाडी शिक्षणाचे महत्व. |
| ४.३ | अंगणवाडी शिक्षणाच्या पध्दती. |
| ४.३.१ | किंडरगार्डन किंवा बालोद्यान पध्दती. |
| ४.३.२ | माँटेसरी पध्दती. |
| ४.३.३ | नर्सरी पध्दती. |
| ४.३.४ | न्यू किंडरगार्डन पध्दती. |
| ४.३.५ | अंगणवाडी. |
| ४.३.६ | बालवाडी. |
| ४.४ | अंगणवाडी शिक्षणाची उद्दीष्टे. |

# प्रकरण ४ थे

## *अंगणवाडी शिक्षणाची तात्विक व मासशास्त्रीय बैठक*

मुलांच्या स्वावलबनाच्या नैसर्गिक धडपडीला अवकाश देणार अंगणवाडी शिक्षण असले पाहिजे. हे तत्व मान्य करावे लागते. मुलांचे वारावण समृध्द सुरक्षित परंतु नियंत्रित करणे ही अंगणवाडी शिक्षणाची एक बाजू आहे. घोडयाला पाण्याजवळ नेल्यावर पाणी पिणे ही क्रिया सर्वस्वी घोडयावर अवलंबून असते. त्याचप्रमाणे मूल स्वावलंबनाने शिक्षण स्वतःच घेत असते. शिक्षक त्याला प्रोत्साहन देवून मार्गदर्शन करीत असतो. "मुलांच्या शक्तिची योग्य कल्पना नसल्यामुळे त्याला अकारण मदत केली जाते." मुलांच्या विकासात योग्य अशा क्रिया स्वेच्छेने करण्याचे स्वातंत्र्य देणे ही गोष्ट अंगणवाडी शिक्षणात अत्यंत महत्वाची समजली पाहिजे स्वयंम शिक्षणाच्या दृष्टीकोनात अमूलाग्र बदल झालेला आहे. अनुशासनाला स्वयं - अनुशासनाचे स्वरुप आले आहे.

व्यक्तिचा एकूण विकास त्यांने जन्माबरोबर आणलेल्या अनुवांशिक गोष्टीवर ब-याच प्रमाणावर अवलंबून असतो. योग्य प्रकारचे वातावरण मिळाले तरच या अनुवांशिक गोष्टी आपला प्रभाव दाखवितात. म्हणजे व्यक्तिच्या विकासात अनुवंशिकता बदलणे शक्य नाही. परंतु विशिष्ट अनवंशिकतेमुळे व्यक्तिला जे नाही. परंतु विशिष्ट अनुवंशिकतेमुळे व्यक्तिला जे काही साध्य होणे शक्य असेल ते जास्तीत - जास्त प्राप्त व्हावे यासाठी वातावरणाचा उपयोग होत असतो. वातावरणाच्या परिणामळामुळे व्यक्तिच्या वागणुकीत घडून येणारा बदल म्हणजे शिक्षण होय. शिक्षण हे विकासकार्याला पोषक त्यास विशिष्ट वळण लावणारे व त्यांचा उपयोग करुन घेणारे असते. म्हणून योग्य अशा विकासकार्याला पोषक असे वातावरण आहे किंवा नाही याची तपासणी करुन ते तसे नसल्यास

व्यक्तिला योग्य वातावरण मिळवून देणेच्या गोष्टी शिक्षणा मिळवून देणे या गोष्टी शिक्षणाच्या कक्षेतील आहेत.

व्यक्तिविकासाचे नैसर्गिक ध्येय जीवन सुखी व समृध्द करणे हे आहे. शिक्षणाचाही हाच उद्देश असतो. व्यक्तिविकास हा प्रत्यक्ष जीवन जगण्यास घडून येत असतो. व्यक्तिविकास हा प्रत्यक्ष जीवन जगण्यास घडून येत असतो. शिक्षणाची उपयुक्तता ही प्रत्यक्ष जीवनासाठीच असते. कारण गरज ही शिक्षणाची जननी आहे. शिक्षणाची दृष्टीकोण वर्तमान व भविष्य या दोन्ही कालांवर केंद्रित असतो. म्हणजे भविष्यकाळी अमुक एक गोष्ट साध्य व्हावी म्हणून वर्तमानकाळी काय केले पाहिजे. अशी शिक्षणाची दृष्टी असते. त्याच दृष्टीने व्यक्तिविकासाचा प्रत्येक टप्पा यथायोग्यपणे पार पाडावा हा शिक्षणाचा एक मुख्य उद्देश आहे.

"जीवन शिक्षण याचा अर्थ म्हणजे जीवनासाठी उपयुक्त असे शिक्षण" यास वैयक्तिक व सामाजिक या दोन्ही बाजूचा समावेश होतो. जीवनासाठी उपयुक्त असे शिक्षण प्रत्यक्ष जीवनात जगण्यातच दयावयाचे असा अर्थ जीवन शिक्षण या शब्दात अभिप्रेत आहे. म्हणजे शिक्षण नुसतेच पुस्तकी घेता कामा नये त्याला जीवन व्यवहाराचीही जोड हवी व त्यातून व्यक्तिविकास घडून येण्यास योग्य प्रकारचे वळण मिळावयास हवे.

मुलांमध्ये विशिष्ट प्रकारची कार्यक्षमता वाढावी यादृष्टीने जर कांही विशेष प्रयत्न होत असतील तर ते त्यांच्या शालेय जीवनात होत असतात. शाळेची भूमिका व शाळा ही कल्पना त्याच हेतूने विकास पावलेली आहे. पूर्वी मूल ६ ते ७ वर्षाचे झाल्यावर त्यांचे शालेय जीवन सुरु होत असे कारण तत्पुर्वी मुलांना काही विशेष शिकविता येणे शक्य आहे ही गोष्ट आकलन झालेली नव्हती तसेच जन्मापासून ६ वर्षापर्यंतच्या काळाचे विशेष महत्व स्पष्ट झालेले नव्हते.

## ४.१ अंगणवाडी शिक्षण व मानसशास्त्र

"मानसशास्त्राचा विकास होवून त्याचा उपयोग शिक्षणात होवू लागल्यापासून शिक्षणाची कल्पना अमुलाग्र बदलत गेली. पूर्वी शिक्षण कार्यात मुलाच्या इच्छा अनिच्छेकडे लक्ष दिले जात नव्हते. पुढील आयुष्याची तयारी करण्यासाठी दिले जाणारे ज्ञान म्हणजेच शिक्षण असा संकोचित अर्थ केला जात असे. वर्तमान आयुष्य योग्य रितीने जगणे हिच पुढील आयुष्याची तयारी आहे. याकडे दुर्लक्ष झाले. तसेच ज्ञान देण्याचे एकमेव साधन भाषा हेच होते. आणि घोकंपट्टी हिच शिक्षणाची पध्दत होती. म्हणून ६ वर्षाच्या आधी शिक्षणाची सुरुवात करणे शक्य नाही."[१]

आज शिक्षण म्हणजे नुसते पुस्तकी ज्ञान देणे हा अर्थ अभिप्रेत नाही तसेच ज्ञान देणे म्हणजे भांडयात कांही वस्तु भरण्यासारखी क्रिया नाही. शिक्षण हे जीवनाची वाढ करीत असते अन्न जसे अंगी लागते व त्याचे योग्य रुपांतर होवून शरीरात मिसळून जाते तशीच काहीशी क्रिया शिक्षणात घडत असते. शरीराला योग्य अन्न कोणते? ते किती प्रमाणात व कोणत्या वेळी घ्यावे? शरीराला अपाय करणारे अन्न म्हणजे काय? चांगले अन्न शरीराला कसे आवश्यक ठरु शकते या सर्व गोष्टी समजून घेण्यात शरीरशास्त्राचे ज्ञान करुन घ्यावे लागते. त्याचप्रमाणे शिक्षणाचा योग्य उपयोग होण्यास मानसशास्त्राची मदत घ्यावी लागते. शरीरविकास व अरोग्य यांना व व्यायाम यांची गरज लागते तसेच मानवविकास आरोग्य यांना अनुभव व शिक्षण याची गरज लागत असते. शरीरविकास व आरोग्य यांच्या नियमाकडे दुर्लक्ष करुन जसे चालत नाही. त्याचप्रमाणे शिक्षण सफल होण्यास मानशास्त्राची आवश्यकता असते.

---

१) केळकर स.आ. "पूर्व प्राथमिक शिक्षण भाग १"
मुंबई : केळकर प्रकाशन लक्ष्मी बाग, जोगळेकर वाडी, शीव, मुंबई.
प्रथम आवृत्ती १९६१ पा.क्र. २.

शिक्षणशास्त्राचा मानसशास्त्राशी असलेला घनिष्ठ संबध मान्य केला तरी त्याचे स्वरुप काय आहे याबद्दल मतभेद आढळतात. मनाच्या विकासाचा निश्चित मार्ग आहे व त्याला शिक्षणाची मदत झाली तर योग्य वेळी कळीचे रुपांतर सुंदर पुष्पात होते, तसा मनाचा विश्वास होतो. म्हणून निसर्ग नियमांना योग्य वाव देणारे शिक्षण असले पाहिजे. असे कांही लोक म्हणतात. तर कांहीच्या मते मनाचा विकास अध्यात्मिक स्वरुपाचा असल्यामुळे जीवन कसे घालविणे योग्य आहे. हे ठरवून शिक्षण दिले पाहिजे.

अंगणवाडी शिक्षणाला मिळलेली चालना मुळात मानसशास्त्रापासून निघालेली आहे. गर्भधारणेपासून ६ वर्षापर्यंतचा काळ शैक्षणिक दृष्या अत्यंत समृध्द असा काळ आहे. आजपर्यंत झालेल्या संशोधनावरुन हेच तत्व सर्व मानसशास्त्रज्ञ व शिक्षणशास्त्रज्ञ मान्य करतात. या काळात मानसविकास व शरीरविकास जलद गतीने होत असतो. जन्माच्या वेळी शारीरीक दृष्टीने अत्यंत असाह्य असणारे मुल ६ वर्षापर्यंत पुष्कळच स्वतंत्र होते. त्याच्या मेंदूचा विकास पुष्कळसा याच काळात होत असतो.

मुल स्वताच्या मनाची घडण स्वताच करीत असते त्याला मदत करणे हेच बालशिक्षण होत. मुल स्वता जरी स्वताला घडवित असले तरी त्या क्रियेत त्याला मोठयाच्या मदतीची आवश्यकता असतेच ही विकासाची क्रिया तिला बिजातून अंकूर फुटुन त्याचा वृक्ष होण्यासारखी आहे. रोपटयाला योग्य खतपाणी मिळवून देणे व थंडीवारा आणि अधिक उष्णता यापासून त्याचे संरक्षण करणे हे काम माळयाचे आहे. मोठी माणसे प्रेमाने मुलांचा सांभाळ करतात तेंव्हा माळयाचेच काम करीत असतात. शारीरीक सुरक्षितता व प्रेम या दोन गोष्टींची गरज मुलांना असते. या दोन गोष्टी योग्य प्रमाणात मिळाल्या तरच त्यांची वाढ योग्य चांगली होते. म्हणून अंगणवाडी शिक्षणात बालप्रेम व सहानुभूती यांचे विशेष स्थान आहे.

स्वावलंबन प्राप्त करण्यासाठी नकळत ज्ञान ग्रहण करणे ही मुलांची याकाळातील विशेषता आहे. ती जाणून घेणे शिक्षकाचे कर्तव्य आहे. मुलांना स्वावलंबी होण्यास उत्तेजन दयाला हवे. नकळकत ज्ञान ग्रहण करणयाचा त्यांचा काळ वाढवायला हवा. त्याकाळचा जास्तीत जास्त उपयोग करुन घेण्यास शिक्षणाने मुलांना मदत केली पाहिजे. तरच तो बालशिक्षक होय. यासाठी शिक्षकाला बालमानशास्त्र काय असते, व त्याचा विकास कसा होतो हे माहित असले पाहिजे. बाल अवलोकन सुक्ष्म समंजसपणे होण्यास त्याची शिक्षकाला गरज असते. परंतु मानसशास्त्रज्ञ जरी महान असले तरी बालप्रेम व सहानुभूती यांच्या बळावर शिक्षकाला अंतःप्रेरणेने मार्ग सापडतो.

अडीच ते सहा वर्षाच्या काळात होणा-या विकासाची गती अधिच्या मानाने थोडी सावकाश असते. या काळाची विशेषता म्हणजे आधी सुरु झालेल्या विकासाच्या निरनिराळया बाजूचा विकास सतत चालू असतो व त्याचा समन्वय घडुन येण्याचे काम साधले जाते. विकासाची नवीन बाजू यात विशेष आढळत नाही. परंतु समन्वयाला विशेष महत्व आहे.

मूलं स्वतःच्या गरजा स्वतः भागविण्यास अधिक स्वावलंबी बनते यात मुलाच्या स्नायुविकासाला अधिक महत्व आहे. स्नायुंची वाढ होणे व स्नायुची क्रिया संचलनावर ताबा येणे, क्रियेचा विरोध करण्यासाठी स्नायुचा वापर करत येणे आणि एकूण शारिरीक बल वाढणे या गोष्टीचा अंतर्भाव स्नायु विकासात होतो.

अडीच ते सहा वर्षापर्यंतच्या काळातील दुसरी विशेषता म्हणजे भाषा विकास होय. "हा विकास वातावरणाच्या स्थितीवर विशेष अवलंबून असतो. म्हणून यात परिपक्व भावनेपेक्षा वातावरणाला विशेष महत्व आहे. परिपक्व भावनेचे यातील कार्य म्हणजे उच्चार करता येण्यासारखा स्वरयंत्रणेचा विकास होणे व आकलनशक्ती वाढवणे हे होय. शब्दभांडार वाढण्यास समृध्द

वातावरणाची गरज असते. भाषावकिासाचे कार्य हे कित्येक अंगी कुटुंब, शेजार, जात व समाज यावर अवलंबून असतो. म्हणून भाषाविकास किती होतो याबाबत सर्वसामान्य विधान करता येत नसले तरी अमेरीकेतील टोव्हा विद्यापीठातील संशोधन लक्षात घेण्यासारखे आहे. त्यांच्या तपासणीप्रमाणे अडीच वर्षाच्या मुलाला ४४६ शब्द अवगत होतात. तर ६ वर्षाच्या मुलाची प्रगती २५६२ शब्दापर्यंत गेलेली असते."[२]

## ४.२ अंगणवाडी शिक्षणाचे महत्व

शिक्षणाची सुरुवात या दृष्टीने अंगणवाडी शिक्षणाला विशेष महत्व आहे. इमारतीची मदार (डोलारा) त्यांच्या चांगल्या भरभक्कम पायावर असते. म्हणून इमारत बांधताना पाया घालण्याच्या कामकडे विशेष लक्ष पुरवावे लागते. तीन गोष्ट अंगणवाडी शिक्षणाला लागू आहे. कारण हे शिक्षण म्हणजे पुढील सर्व शिक्षणाचा पाया आहे. सामान्यपणे कोणतेही काम यशस्वी होण्याची गुरुकिल्ली ते काम चांगल्या रितीने सुरु होण्याची गरज असते. चांगल्या रितीने सुरु झालेले काम अर्धेअधिक सफल झाले असे मानतात ते याच दृष्टीने होय. म्हणजेच नंतरच्या काळातील कार्यकौशल्याला महत्व नाही असे नाही. परंतु सुरुवातीच्या कार्याला विशेष महत्व असते.

व्यक्तिच्या जीवनात काही गोष्टी साध्य करुन घेण्याचा विशेष काळ असतो. ती वेळ टळल्यावर मग पुढ ती गोष्ट कधीही साध्य होणे शक्य नाही. या दृष्टीने ५ वर्षापर्यंतच्या वयाचे खास महत्व आहे. कारण कांही बाबतीत याच वेळी योग्य रितीने प्रयत्न करुनही कांही गोष्टी साध्य करुन घ्यावयाच्या असतात. उदा. विशिष्ट उच्चाराचे वळण लहाणपणीच ग्रहण व्हावे लागते.

---

२) 'कित्ता' पा.क्र. - ६.

परकीय भाषेतील उच्चार मोठेपणी शिकताना अवघड जाते व कधीकधी जमत नाही. कारण जीभ व तोंडाचे स्नायु यांची ते उच्चार करण्यात लागणारी लवचिकता व सवय पुढे प्राप्त होत नाही.

मुलांना ज्या सवय लागू नयेत अशी आपली इच्छा असते त्या जर त्यांना लहानपणीच नकळत लागल्या तर नंतर त्या सवयी काढून टाकण्याचे अधिक अवघड काम करावयाचे वेळ येते व या गोष्टीमध्ये नेहमीच सफलता मिळते असे नाही. ब-याच सवयी काढून टाकण्याचा प्रयत्न करणे ही गोष्ट शिक्षणात अंतर्भूत आहे. परंतु अशा सवयी होता होईल तो लागू न देणे हेही शिक्षणाचे काम आहे. यादृष्टीने शिक्षणाचे अधिक महत्व आहे.

मुलांना अडीच ते पाच सहा वर्षाच्या काळात बरेचसे शिक्षण देता येणे शक्य असते. ही गोष्ट आज उघड झालेली आहे. तेंव्हा या दृष्टीने काही नियोजित प्रयत्न केले नाही तर हा काळ फुकट गेला असे होईल. आजच्या जीवनात प्राथमिक तयारी करण्यात शिक्षणाचा बराचसा काळ घालवावा लागतो. तेंव्हा ही वेळ फुकट घालविणे हे ह्या युगात परवडण्यासारखे नाही. कारण त्यामुळे योग्य प्रकारचे शिक्षण योग्य वयात पूर्ण करता येत नाही. आणि त्याप्रमाणात जीवन सुरुवातीमध्येच कांही कमतरता राहते. म्हणूनच यादृष्टीने अंगणवाडी शिक्षणाचे महत्व अधिक आहे.

भारतातील आठ व्यक्तिंमागे एक व्यक्ति अंगणवाडी शिक्षणाच्या वयोगटात येते. सामान्यपणे अंगणवाडी शिक्षण हे ३ ते ५ वयोगटातील मुलांसाठी आहे. या वयाच्या मुलांच्या शारिरीक, बौध्दीक व भावनिक दृष्टया अपेक्षित विकास होण्यासाठी योग्य वातावरणाची गरज असते. मानसशास्त्रातील अलिकडील संशोधनात अशा प्रकारच्या अपेक्षित विकासासाठी मुलांच्या जन्मापासूनच नव्हे

तर मुल मातेच्या पोटात असल्यापासुनच आवश्यकता असते असे सिध्द झालेले आहे.

शैश्यावस्थेमधील मुलांवर जे बरेवाईट संस्कार होतात ते चिरकाल टिकाणारे असतात. ते मानशास्त्रीय दृष्टीने सत्य आहे. या कालखंडात अपेक्षित चांगल्या सवयी प्रवृत्ती याचा विकास व्हावयाचा असतो. व्यक्तिविकास व जीवनाची सफलता ही शिक्षणाची उद्दीष्टे मानली तर मुलांवर योग्य काळात योग्य संस्कार होणे आवश्यक आहे. अंगणवाडी शिक्षणाचा लाभ मिळालेली मुले पुढील शिक्षणात अन्य मुलांमध्ये जास्त मिसळतात. असे प्रसिध्द मानसशास्त्रज्ञ जरसिल्ड (Jersild) यांचे म्हणने आहे. वॉल्श (Walsh) यांनी बालमंदिरात जाणा-या अशा २२ मुलांच्या दोन गटांची परिक्षण ६ महिने केले त्यावरुन बालमंदिराचा विशेष चांगला फायदा मिळतो व बालमंदिरात न जाणारी मुले त्यापासून वंचित राहतात असे आढळून आले.

व्यक्तिचा सर्वागिण विकास हे शिक्षणाचे ध्येय असले पाहिजे असे आपण आवर्जून सांगतो. व्यक्तिच्या सर्वागिण विकासाची मुहुर्तमेढ बालकाच्या संस्कारक्षम्य वयातच घातली गेली पाहिजे याबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. " Well Begun is half done" अशी इंग्रजी म्हण आहे. बालकाच्या शिक्षणाची सुरुवात चांगल्या प्रकारे झाली म्हणजे अर्धेअधिक काम झाले. असे मानण्यास हरकत नाही. कारण शिक्षणाची बालकाला एकदा गोडी लागली की मग पुढील काम फार सोपे असते. जे लहानपणी शक्य असते ते सर्व मोठेपणी शक्य असतेच असे नाही. "बालमंदिरात झालेला परिणाम तात्कालीक नसतो तर तो पुढेही टिकतो. असे व्हॅने ऑल्स्टिन व हॅटविक यांनी १६५ मुलांच्या प्राथमिक शिक्षणात केलेल्या पाठपुराव्यात आढळून आले आहे."

## ४.३ *अंगणवाडी शिक्षणाच्या पध्दती*

भारतातील अंगणवाडी शिक्षणाची सुरुवात गेल्या १०० - १५० वर्षातील आहे. या शिक्षणाची सामाजिक व्यवस्था करण्याकडे लक्ष जाण्याचे एक कारण म्हणजे औद्योगिक क्रांतीमुळे उत्पन्न झालेली सामाजिक परिस्थिती होय. क्रांती प्रथम इंग्लडमध्ये झाली. त्यामुळ तेथे कारखाने निघू लागले. कारखान्यात पुरुष व स्त्री अशा दोघांनाही कामे मिळू लागली त्यामुळे मूलांकडे लक्ष देणे कठीण झाले याचा परिणाम मुलांवर अनिष्ठ होवू लागला तेंव्हा याबाबत कांहीतरी व्यवस्था असावी असा विचार करणारा कारखानदार वर्गात रॉबर्ट ओवेन हा विचारवंत पुढे आला. त्याने आपल्या कारखान्यातील कामगारांच्या अगदी लहान म्हणजे (२ ते ५) वर्षाच्या मुलांसाठी एक शाळा काढली या वयोगटातुन पुढे कारखान्यातील स्त्री कामगारांच्या दोन अडीच वर्षापेक्षा लहान मुलांसाठी अर्भकालय याची कल्पना आज विकास झालेली आढळते. यासाठी पुढारलेल्या देशात कायदेही झालेले आहेत. कित्येक कारखान्यात अर्भकालय व मोठया मुलांसाठी बालमंदिरे चालविले जात आहेत.

रॉबर्ट ओवेनच्या उपक्रमावरुन त्यांची विशेष शैक्षणिक पध्दती असाही विचार करता येईल. याचवेळी फ्रोबेलचेही कार्य चालू होते. म्हणून प्रथम विचार करणारा फ्रोबेल हा होय. रॉबर्ट ओवेन हा रुसो प्रेस्टीलॉनी या पुरगामी तज्ञास अनुसरून त्यांने आपले किंडरगार्डन पध्दती १८३७ साली बालमंदिर बांधून प्रस्तुत केले. याबाबत त्याने खोलवर विचार केला होता. म्हणून आजही कांही अंगणवाडीच्या शिक्षणावर त्यांचा विचाराची छाप विशेष आढळते. त्यांच्यामागून डॉ.मॉंटेसरी यांच्या कामाला ७० वर्षानंतर सुरुवात झाली व त्यांनी आपली मॉंटेसरी पध्दती जगाच्या निदर्शनात आणली याशिवाय नर्सरी पध्दती म्हणून एक वेगळी प्रचलित आहे. अमेरीकेत न्यू किंडरगार्डन पध्दती विकास पावली.

भारतात म.गांधीच्या प्रेरणेत शैक्षणिक विकासात क्रांती घडून आली. या धर्तीवर बुनियादी तालीम पध्दतीची बालमंदिरे चालविण्याचा उपक्रम कांही ठिकाणी आढळतो.

## ४.३.१ *किंडरगार्डन किंवा बालोद्यान पध्दती*

या पध्दतीचा जनक हा फ्रोबेल होय त्यांने पूर्वप्राथमिक शिक्षणाचा तात्विक विचार करुनच बालमंदिरे काढली होती. फ्रोबेलने पेस्टालाजीच्या प्राथमिक शिक्षणात भर घालून व त्यात नविन सुधारणा करुन या पध्दतीचा उगम केला आहे. बालोद्यान पध्दती सुरु करण्यामागिल त्याची भूमिका अतिशय महत्वाची मानली जाते.

१) मुलांच्या नैसर्गिक विकासास मदत करण्याचे तत्व त्यांने विशेष महत्वाचे मानले आहे.

२) या पध्दतीमुळे मुलांमध्ये भिन्न भिन्न प्रकाराच्या अभिरुची निर्माण करता येतात.

३) या पध्दतीत खेळांना व खेळकर वृत्तीस विशेष स्थान फ्रोबेलेने दिले आहे.

४) या पध्दतीमुळे मुलांचे शिक्षण प्रत्यक्ष अनुभवाच्या पायावर आधारले जावे म्हणून विविध प्रकारची साधने उपयोगात आणली जातात.

५) मुलांचा कल्पनाविकास व योग्य बुध्दीविकास व्हावा म्हणून गाणे, गोष्टी खेळ, यांना प्राधान्य देण्यात येते.

६) या पध्दतीत मुलांच्या रचनात्मक प्रवृत्तीला भरपूर वाव मिळावा म्हणून हस्त व्यवसायाना स्थान देण्यात येते.

७) शाळेंचे वातावरण नैसर्गिक असावे. त्यात खेळण्यासाठी मोकळी जागा असावी. आजूबाजूला बाग बगिचा असावा अशी कल्पना आहे. शिक्षकांचे

काम माळयासारखे आहे. म्हणून फ्रोबेलने आपल्या या पध्दतीलाच बालोद्यान असे नांव दिले.

फ्रोबेलचे या पध्दतीस शिक्षणाचे स्वरुप बालकेंद्रित केले आहे. शिक्षणातील प्रत्येक गोष्टीचा विचार मुलांच्या दृष्टीकोनातून प्रथम व्हावयास पाहिजे म्हणून अंगणवाडी शिक्षण मुलांच्या आटोक्यात दयावे. म्हणून शैक्षणि साधनांचा वापर करण्याची त्यांची कल्पना होती. आज त्याबाबतीत पुष्कळच प्रगती सर्वत्र आढळून येत आहे. परंतु फ्रोबलेने सुचविलेली साधने पाहण्यास जरी मिळत नाही तरी त्या साधनावरुन नविन कल्पना सुचवून तयार केलेली अन्य साधने आज अंगणवाडी शाळेत पहावयास मिळत आहेत.

## ४.३.२ माँटेसरी पध्दती

माँटेसरी पध्दतीची सुरुवात १९०७ साली झाली. या पध्दतीची निर्मिती डॉ. मेरिया माँटेसरी यांनी केली आहे. या पध्दतीचा उगम प्रथम इटलीमधील रोम या शहरी झाला आहे. या पध्दतीत जीवनविषयक व्यवहाराना विशेष स्थान आहे. अंगणवडी शाळेतील मुलांच्या गरजा त्यांना स्वतः भागविता येऊन ते त्या दृष्टीने स्वावलंबी व्हावे हा या पध्दतीमागील हेतू आहे.

या पध्दतीमुळे मुलांना योग्य चालीरीती व सवयी उत्पन्न होण्यास मदत होते. डॉ. मेरिया माँटेसरीनी तयार केलेली ज्ञानेंद्रिय शिक्षणाची साधने उपयोगात आणून साम्यभेद व तारतम्य या बाबतीत मुलाचे अनुभव स्पष्ट करता येतात. तसेच पुढील शिक्षणासाठी लागणारे लेखन, वाचन, गणित व विज्ञान याबाबतीत तयारी करुन घेता येते याबाबतीत विशेष प्रकारची साधने तयार करुन ती प्रचारात आणली जात होती. आज त्या साधनांची किंमत व अपुरी जागा या

मुळे ती साधने वापरता येत नाही. परंतु त्या साधनांना अनुसरुन कांही साधने तयार केलेली आहेत.

मॉंटेसरी पध्दतीत वेळापत्रक नसते. व्यक्तिगत शिक्षणावर अधिक भर देण्यात येतो. तसेच मुलांनी काय शिकावे व कें‌व्हा शिकावे हे ठरविण्याचे स्वातंत्र्य मुलांना मिळत असते. खेळण्याच्याबाबतीत या पध्दतीत महत्वाचे स्थान देण्यात येते. ही पध्दत अतिशय खर्चिक आहे. त्यामुळे आपल्याकडील अंगणवाडी शाळेत या पध्दतीप्रमाणे पूर्णपणे शिक्षण देणे शक्य होत नाही.

मॉंटेसरी पध्दतीचा प्रकार बालोद्यान पध्दतीसारखा झाला नाही. आपल्या देशात तर मॉंटेसरी बाई आल्या होत्या व त्यांनी ज्या कांही शिक्षिका तयार केल्या, तेवढयापुरत्याच मर्यादीत शाळेत अशा प्रकारचे शिक्षण दिले जात आहे. तसेच या पध्दतीत साधनांना अतिशय महत्व दिल्यामुळे मुलाच्या स्वातंत्र्यावर बाधा येण्याची शक्यता असते. म्हणून भारतात या पध्दतीचा फारसा प्रसार झालेला दिसून येत नाही.

### ४.३.३ <u>नर्सरी पध्दती (शिशुवर्ग)</u>

नर्सरी या शब्दाचा अर्थ 'मुलांची खोली' असा आहे. युरोपात उमराव लोकांमध्ये लहान मुलांसाठी वेगळी खोली असते. त्या खोलीत मुलांना खेळण्यासाठी दायांची व्यवस्था केली जात असे व या सामाजिक रुढीवरुन अगदी लहान मुलांच्या शिक्षणाला नर्सरी शिक्षण असे नांव प्राप्त झाले आहे.

नर्सरी पध्दतीमध्ये लहान मुलांना खेळवणे व रमविणे हे काम मुख्य मानले जाते. त्यासाठी गाणी, गोष्टी, खेळ, चित्रकला, बांधकाम, मुक्तव्यवसाय व रचनात्मक व्यवसाय यांचा उपयोग यथावकाश केला जातो. मुलांमध्ये कांही सवयी चांगल्या सामाजिक सवयी निर्माण व्हायला निर्माण व्हाव्यात व त्यांची

प्राथमिक शिक्षणासाठी मानसिक तयारी व्हावी या गोष्टी या पध्दतीत अंतर्भूत आहेत.

या पध्दतीची स्वताची अशी विशेष काही साधने नाहीत. या पध्दतीत बालोद्यान व मॉंटेसरी पध्दतीतील साधनांचा वापर काही प्रमाणात केला जातो. या पध्दतीनुसार आपल्याकडे फारसे शिक्षण दिले जात नाही. परंतु या पध्दतीतील काही तत्वे वापरण्यात येतात. उदा. चित्रे, खेळणी, गाणी, गोष्टी, चित्रकाम इत्यादी सामान्यपणे या पध्दतीचे स्वरुप किंडरगार्डन पध्दतीप्रमाणेच आहे.

## ४.३.४ न्यू किंडरगार्डन पध्दती

युरोपातील किंडरगार्डन पध्दतीकडे अमेरीकेतील लोकांचे लक्ष गेल्यावर त्यांना या अंगणवाडी पध्दतीविषयी आकर्षण वाटू लागले. त्यामुळे अमेरीकेत या पध्दतीचा प्रसार बराच झाला. बालोद्यान पध्दती आत्मसात केल्यानंतर फ्रोबेलची मुलतत्वे समजूर घेवून त्यांनी या पध्दतीचे स्वरुप गरजेनुसार बदलून व त्या पध्दतीला न्यू किंडरगार्डन पध्दत असे नांव दिले त्यासाठी त्यांनी निरनिराळी बरीच शैक्षणिक साधने बनवून उपयोगात आणली त्यामुळे फ्रोबेलची मूळची साधने मागे पडली अमेरीकेतील मानसशास्त्रीय नवीन शोधामुळे या पध्दतीत सुधारणा करण्यात आल्या त्यामुळे या पध्दतीला न्यू किंडरगार्डन म्हणण्यात येते.

अमेरीकेत आताही या पध्दतीचे अंगणवाडी शिक्षण दिले जात आहे. या पध्दतीमुळे बालकाचे आरोग्य चांगले व निरोगी राहण्यास मदत होते. मुलांच्या भावनावर ब-याचवेळा घरच्या मंडळीकडून न कळत दडपण पडते व त्यामुळे त्यांच्यात न्यूनगंड व विकृती निर्माण होतात. म्हणून लहान मुलांना अशा पध्दतीच्या शाळेत घालून हे दोष दूर करता येतात.

या पध्दतीप्रमाणे शिक्षण देण्यासाठी लागणारा शिक्षक वर्ग तयार करण्यासाठी १९२० मध्ये कोलंबीया विद्यापीठात अंगणवाडी शिक्षिकांसाठी प्रशिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. आजतर औद्योगिकरणाबरोबर या शाळेंची गरज वाढत आहे. त्यामुळे अशा शाळांची संख्याही झपाटयाने वाढत आहे.

अमेरीकेत या पध्दतीच्या शिक्षणाची सुरुवात वयाच्या ३ -या वर्षापासून सुरु होते. यापध्दतीत अनेक शैक्षणिक साधनांचा खेळांच्या रुपाने उपयोग केला जातो. हस्तव्यवसाय, गाणी, खेळ, सहली, अशा अनेक प्रकारच्या साधनांचा उपयोग करुन विविध विषयांची ओळख केली जाते.

### ४.३.५ *अंगण बालवाडी पध्दती*

झोपडपट्टीत राहणा-या लोकांच्या अंगणात जे काही अंगणवाडी शिक्षणाचे काम होते. त्याला अंगण - बालवाडी असे नांव श्रीमती ताराबाई मोडक यांनी दिले आहे. हे काम सकाळी आणि सायंकाळी एक दोन तास चालते. ते झाडयाच्या सावलीत किंवा अन्य सोईस्कर जागा पाहून केले जाते. या पध्दतीने शिक्षण देण्यासाठी इमारत नसते. तसेच जी साधने वापरण्यात येतात ती कमी किंमतीची असतात. बरेच बालवाडी शिक्षणाचे काम या अंगणबालवाडीत साधनाशिवाय घेतले जाते.

या प्रकारच्या शिक्षणात गाणी, गोष्टी, गप्पागोष्टी, अभिनय गीते व काही प्रकारचे हस्तव्यवसाय यांना मुख्य स्थान असते. स्वच्छतेच्या दृष्टीने हातपाय धुणे, केस विचंरणे, नखे कापणे वगैरे गोष्टी या प्रकारात येतात. त्याचप्रमाणे त्वचेच्या कांही रोगावर ओषधपाणी केले जाते. उदा. खरुज इत्यादी.

### ४.३.६ बालवाडी

ग्रामीण बालशिक्षणाच्या केंद्राला श्रीमती ताराबाई यांनीच हे नांव दिले आहे. बोर्डीत फळांच्या वाडया आहेत तेथेच त्यांनी हे बालशिक्षणाचे कार्य प्रथम सुरु केले म्हणून जशा फळांच्या वाडया तसीच बालकांची वाडी असे म्हणून त्यांनी बालवाडी हे नांव दिले. वास्तविक बालमंदिर व बालवाडी यात तात्विक भेद काही नाही. बालमंदिरात नागरी जीवनाला अनुसरुन साधने व्यवस्था व कार्यक्रम असतो तर बालवाडीतील वातावरण ग्रामीण जीवनाला अनुसरुन असते. बालवाडयात कार्यक्रमाची प्रतवारी ठरविताना ग्रामीण जीवनाचा विशेष विचार करुन त्यातील उणिवा दूर करुन त्याला पूरक असे स्वरुप देण्याचा प्रयत्न केला जातो.

### ४.४ अंगणवाडी शिक्षणाची उद्दिष्टे

आजच्या काळात अंगणवाडी शिक्षणाची गरज अनेक सामाजिक कारणामुळे उत्पन्न झाली आहे. म्हणूनच शहरात व ग्रामीण भागात बालमंदिरांची संख्या पुष्कळ प्रमाणात वाढत चालली आहे. म्हणून शिक्षणात अंतर्भूत होणा-या गोष्टीकडे जिज्ञासू लोकांचे लक्ष ठेवले जात आहे. म्हणून शिक्षणात अनेक पध्दती आहेत. त्या पध्दतीप्रमाणे या शिक्षणात काय असावे व काय नसावे याबाबत अनेक मतभेद आहेत. परंतु त्या मतभेदाकडे दुर्लक्ष करुन या शिक्षणाच्या सामान्य स्वरुपाचा विचार करणे आवश्यक आहे. या शिक्षणाचा उद्देश निरनिराळया बाबतीत होणा-या मुलांच्या विकासात मदत करणे हा आहे. त्या दृष्टीने या शिक्षणाची अनेक उद्दिष्टे आहेत. ती उद्दिष्टे या शिक्षणातून सफल करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे.

## ¤ शिक्षणाची उद्दिष्टे ¤

१) स्नायू विकास

२) ज्ञानेंद्रिय शिक्षण

३) भाषा विकास

४) भावना विकास

५) सामाजिक विकास

६) खेळण्याची नैसर्गिक वृत्ती व बुध्दीविकास

७) लेखन, वाचन, गणित, विज्ञान याबाबत प्राथमिक कल्पना देणे.

> **स्नायू विकास :-**

स्नायू विकासात स्नायूची वाढ व स्नायूसहकार्याने कृती करण्यात कार्यक्षमता वाढविणे या दोन गोष्टीना महत्व आहे. स्नायूची वाढ योग्य प्रकाराच्या पोषक अन्नावर अवलंबून असते आणि स्नायूची कार्यक्षमता वाढविण्यासाठी त्याचा उपयोग वारंवार करुन विशिष्ठ प्रकारच्या क्रिया करण्याचे कौशल्य प्राप्त करुन घ्यावे लागते. या दोन्ही गोष्टी एकमेकांना पोषक आहेत. कारण स्नायूचा उपयोग केल्यामुळे स्नायूची वाढ होण्यास मदत होते. स्नायूची वाढ झाल्याशिवाय क्रिया कौशल्य प्राप्त होत नाही. यासाठी प्रथम मोठया स्नायूच्या संचलनावर ताबा येणे व त्यांच्या परस्पर सहकार्याने विशिष्ट कार्य करता येणे या गोष्टी साध्य कराव्या लागतात.

अंगणवाडी शाळेत मुलांना स्नायू विकास करण्यासाठी त्यांच्या खेळाबाबतच्या स्वाभाविक वृत्तीचा विचार करुन अनेक प्रकारचे व्यवसाय या शाळेत ठेवणे आवश्यक असते. या खेळाचे आकर्षण वाटून पुन्हा पुन्हा ते खेळ किंवा व्यवसाय करण्यात मुले गढून जातात. या खेळांमुळेच विशिष्ट प्रकारचे स्नायु सहकार करण्याचे कोशल्य प्राप्त होत असते. या शाळेमध्ये मुक्त व्यवसायाची कामे जीवन व्यवहाराची कामे, क्रिडांगणावरील खेळ, बागकाम,

हस्तव्यवसाय कलाकृतीचीकामे व बालप्रत्रास इत्यादी व्यवसायामुळे स्नायुविकास होण्यास मदत होईल.

> **ज्ञानेद्रियाचे शिक्षण :-**

बाह्य जगाचे ज्ञान प्राप्त करण्यासाठी आपल्या शरीरात काही विशिष्ट योजना व यंत्रणा असते. त्यांना ज्ञानेद्रिये म्हणतात. उदा. डोळे, कान, नाक, जीभ व त्वचा अशी पाच ज्ञानेद्रिये आहेत. या शिक्षणात ज्ञानेद्रिये शिक्षणाला विशेषस्थान आहे. मुलांचा इंद्रिय विकास या कालातच होत असतो. इंद्रिये जसजशी कार्यक्षम होतात तसतसा त्यांचा उपयोग करण्याची इच्छा निरनिराळया वेळी दिसून येते.

"मॅडम माँटेसरीच्या म्हणण्याप्रमाणे प्रत्यके इंद्रियाला आपला विकास संपूर्णपणे साध्ण्यासाठी साम्य विरोध व क्रम या तत्वावर आधारलेले शास्त्रीय खेळ उपयोगी पडतात. ज्ञानेंद्रियाचे शिक्षण स्थलूलाकडून सूक्ष्मतेकडे जाणारे असावे लागते. प्रत्येक ज्ञानेंद्रियाचे शिक्षण सुरुवातीला त्यांचे एकाकीकरण करुन देण्याने विशेष लाभ होतो." मुलांमधील कांही दोष योग्य काळीच उघडकीस आण्याचे काम ज्ञानेंद्रिय शिक्षणामुळे आपोआप घडते. मग या दोघांवर योग्य वेळी इलाज करता येतो व ते दोष वेळीच काढून टाकण्यात मदत होते.

ज्ञानेंद्रिय शिक्षणाचे मुख्य कार्य म्हणजे ज्ञानेद्रियांचा उपयोग विशिष्ठ रितीने करण्याची सवय लागणे हा होय. यात संवेदनांतील साम्य विरोध ओळखणे व सारख्या प्रकारच्या संवेदनातील तारतम्यभाव जानणे यांचा अंतर्भाव होतो. या दृष्टीने या वयाचा काळ या शिक्षणाला नैसर्गिक रितीने विशेष अनुकूल असतो.

ज्ञानेंद्रिय शिक्षणाचे महत्व सर्व शिक्षणतज्ञ कबूल करतात पण ते कसे द्यावे याबाबतीत अनेक मतभेद आहेत. काहि जण म्हणतात की मूल आपल्या सामान्य जीवनात निरनिराळी कार्ये करतांना ज्ञानेंद्रियांचा उपयोग करीत असते त्यामुळे त्यांचे ज्ञानेंद्रिय शिक्षण घडत असते. काहींच्या मते मुलाला स्वताच्या गरजा

भावविताना आपल्या ज्ञानेंद्रियाचा व कर्मेद्रियांचा उपयोग करावा लागतो आणि त्या यंत्रणाचा समन्वय घडवावा लागतो तेंव्हा यांचाच उपयोग करुन ज्ञानेद्रिय शिक्षण देण्याची व्यवस्था वेगवेगळी असते तरी पण या शिक्षणाचा समावेश अंगणवाडी शिक्षणांत केला पाहिजे याबाबत दुमत नाही. भाषा विकासाच्या दृष्टीने ज्ञानेंद्रियाच्या शिक्षणाला विशेष महत्व आहे. कारण भाषा ही विशिष्ट अनुभव प्रगट करण्यासाठी वापरावयाची असते व अनुभव मिळण्याचे साधन म्हणजे ज्ञानेंद्रिये होत.

> भाषा विकास :-

बाल शिषणणातच नव्हे तर सर्व शिक्षणात भाषेला एक विशेष स्थान आहे. भाषा हा मानबिंन्दू मानला जातो. आई बोलते ती मातृभाषा ती भाषा मुलाला जन्मापासून ऐकायला मिळते. ही भाषा प्रथम समजणारी आणि नंतर बोलता येणारी अशी असते. बालवाडीत येणारे अडीच तीन वर्षांचे बालक हे नुकतेच बोलू लागलेले असते. त्याच्या भाषेचा विकास या शिक्षणातून करावयाचा असतो. भाषा हे विचारांची देवाणघेवाण करण्याचे महत्वाचे साधन आहे. म्हणून त्याच्या विकासासाठी विशेष प्रयत्न करणे जरुरीचे असते.

"भाषा विकासासाठी अंगणवाडी शिक्षणाच्या कार्यक्रमात दोन प्रकारचे उपक्रम असतात १) सहज भाषाविकास साधणारे २) मुद्दाम भाषा विकासाठी योजावयाचे पहिल्या प्रकारात गोष्ट गाणी, नाटक, खेळ, सहल, इत्यादी गोष्टी येतात. या व्यवसायाचा प्रमुख उद्देश मनोरंजन किंवा दुसरा असला तरी त्यातून भाषा विकास साधता येतो.

दुस-या प्रकारात गप्पा - गोष्टी बातमी सांगणे, व्याकरण, खेळ, वस्तुपरिचय, विज्ञान, गणित, सामान्यज्ञान इत्यादी व्यवसाय मुद्दाम योजून भाषा शिकवावयाची असते. दोन्ही प्रकारातील प्रत्येक उपक्रमाचा जास्त जास्त उपयोग भाषा विकासासाठी करुन घेता येतो."[३]

➤ **भावना विकास (भावनात्मक विकास)**

माणसाच्या व्यक्तिमत्वाच्या विकास हा त्यांच्या भावनात्मक विकासावरच अवलंबून असतो. या भावना दोन प्रकारच्या असतात. १) अनुकुल भावना २) प्रतिकूल भावना "जीवन सुखी किंवा दुःखी होणे हे या दोन प्रकारच्या भावनांचा विकास आणि त्यांची प्रतिक्रिया यावरच अवलंबून राहते अनुकूल भावनांची प्रतिक्रिया ही सुखात्मक किंवा आनंदकारक असते आणि प्रतिकूल भावनांची प्रतिक्रिया ही दुःखकारक असते. तेंव्हा दोन्ही प्रकारच्या भावनांचा समतोल राहणे हे महत्वाचे असते"[४]

बालशिक्षणात या दोन्ही प्रकारच्या भावनांना योग्य वाट दाखवून त्यांचा समतोल विकास साधावयाचा असतो. यापैकी (उदा. प्रेम, वत्सलता, आनंद, सुख, समाधान, त्याग, अनुकुल भावना. मत्सर, राग, भीती, द्वेश, लोभ, स्वार्थ या प्रतिकूल भावना) कुठल्याही भावनेचा अतिरेक होवून चालणार नाही. पण त्यातल्या त्यात प्रतिकूल भावना काबूत ठेवणे हे फार महत्वाचे असते. कुठल्याही भावना संपूर्ण माहिती देवूनही चालणार नाही. राग नाहीसा झाला तर अन्यायाचाही राग यणार नाही. भीत ही भावनाही तशीच आहे. वाजवीपेक्षा जास्त भीती नको परंतु आग, उंची, पाणी, वीज या गोष्टीची जरूर तेथे भीति वाटलीच पाहिजे.

अनकुल व प्रतिकुल दोन्ही त-हेच्या भावनांचा योग्य मार्गाने विकास झाला म्हणजे मुलांची वृत्ती समतोल राहते आणि जीवनात जे सुख किंवा समाधान मिळावयाचे ते त्याला मिळवता येते. त्यांच्या भावनेला योग्य संधी मिळाली पाहिजे. त्यामुळे बालकांच्या आरोग्यावर चांगला परिणाम होतो म्हणून

---

३) ब्रम्हे शांता / आठवले शांता "बालशिक्षण स्वरुप आणि पध्दती"
पुणे : वसंत गोगटे प्रकाशन. प्रथम आवृत्ती १९७९. पा.क्र. ३६.

४) 'किता' पा.क्र. १८

बालशिक्षणांत या दोन्ही प्रकारच्या भावनांचा विकास करण्यासाठी आवश्यक उपक्रमाचा उपयोग केला पाहिजे.

> **सामाजिक विकास :-**

मनुष्य हा समाजप्रिय प्राणी आहे. एकटे राहणे त्याला आवडत नाही. म्हणून तो कुटुंब करुन राहतो. कुटुंबाप्रमाणे नातेवाईक शेजारी - पाजारी यांच्याशी चांगले संबंध ठेवण्यासाठी धडपड करतो समाजात जबाबदार नागरीक म्हणून राहण्यासाठी आपली जबाबदारी समजली पाहिजे. एकमेकांशी सहकार्य

करणे मिळते - जुळते घेणे आणि त्याचबरोबर आपले हक्क मिळविण्यासाठी दुस-यांच्या हक्काचे जतन करणे इत्यादी गोष्टी माणसाला आत्मसात करव्याच लागतात. त्यांची सुरुवात बालशाळेपासून होणे आवश्यक असते.

बालवाडीत बालक येण्यापूर्वी घरी त्याने मागितलेली प्रत्येक गोष्ट त्याला सहज मिळत असते. कारण त्याच्याकडे सर्वांचे लक्ष केंद्रित झालेले असते. दुस-यासाठी काही करावे लागते. काही त्याग करावा लागतो. याची त्याला जाणिव नसते परंतु बालशिक्षणात त्याच्या वयाची सर्व मुले असतात. त्यामुळे फक्त त्याच्याकडे कोणी जादा लक्ष देत नाही. समाजात मिसळण्याचा पहिला धडा मूल तेथेच गिरवते. दिल्याशिवाय मिळत नाही. मग ते प्रेम असो, हक्क असोत किंवा एखादी वस्तू हा व्यवहारातला बारकावा त्याच्या लक्षात हळूहळू येवू लागतो.

या शिक्षणात दुस-याशी कसे वागावे यांचे प्रात्यक्षिक मिळते. आपल्या भावनांना आवर घालून दुस-यच्या हक्कांची जाणीव ठेवावी लागते संयम शिकावा लागतो. घरी अत्यंत हट्ट करणारी मुले शाळेत समजूतदारपणे वागतात घरी स्वतःच्या साहित्याला हात लावू न देणारी मुले शाळेत एकाच साहित्याबरोबर अनेक मुले खेळतात. सामाजिक विकासासाठी सामुहिक कार्यक्रम योजलेले

असतात. उदा. सहल, खेळ, जेवण इत्यादी कार्यक्रमाद्वारा मुले नागरीकत्वाचे धडे घेत असतात. खेळ खेळतांना सर्वांना संधी सहलीला जाताना आपल्यापासून दुस-याना त्रास होवू न देणे वगैरे गोष्टीतून हा विकास करता येतो.

शाळेतील ठराविक कार्यपध्दतीमुळे शाळेतून जाताना नमस्ते करणे. लहान मुलांना सांभाळून घेणे. दुस-यांचा वेळ होईपर्यंत थांबणे रांगेत चालणे अगोदर आलेल्याना प्रथम संधी देणे. मोठया माणसांबद्दल आदर ठेवणे. इत्यादी वागणूकीच्या नियमांचे पालन बालक आपोआपकरु लागते. यातून बालकाचा सामाजिक विकास होत असतो.

## ➤ खेळण्याची नैसर्गिक वृत्ती व बुध्दिविकास

खेळण्याची वृत्ती मुलांना नैसर्गिक देणगीच असते. खेळ खेळताना मुलाना योग्य सवयी लागतात व त्यांची विचार करण्याची शक्ती वाढते त्यातूनच शिक्षण बेलात्मक आहे. पण यांचा अर्थ मुले सर्व निरुपयोगीगोष्टी करतात असा नाहि. कोणत्याही गोष्टीत क्रियेचे स्वातंत्र्य असले व क्रिया करताना आनंद मिळून मनाला प्रसन्नता वाटत असते.

या शिक्षणातील मुलांचा पुष्कळ वेळ खेळण्यात जात असतो. खळण्याची वृत्ती मोठया माणसातही असते. लहान मुलानांही खेळाची आवड निर्माण झाली की कांही वेळा जेवण खाण्याची अठवण देखील होत नाही, वेळेचे भान राहत नाही. अधून मधून खेळत राहणे व विश्रांती घेणे अशा प्रकारची रीत बालखेळात पहावयास मिळते.

ज्या प्राण्यांत बुध्दिविकासाची शक्यता अधिक असते त्याच्या बालपणाचा म्हणजेच पालकांवर अवलंबून राहण्याचा काल अधिक असतो. बालपणाचा व खेळाचा खास संबध आहे. खेळाचे योगे बालपणी योग्य असे शिक्षण मिळावे व बुध्दीविकास व्हावा अशी नैसर्गिक योजना आहे. बालपणी खेळण्याच्या वृत्तीची

जी तीव्रता असते ती मोठेपणी नसते. मोठेपणी इतर गोष्टीचे महत्व माणसाच्या जीवनात अधिक आहे. पण त्यात जर खेळकरपणा टिकवता आला तर जास्त आनंद लाभतो.

मुले का खेळतात? खेळाच्या वृत्तीचे कारण काय? या संबधी मानसशास्त्रज्ञानी बराच विचार केला आहे. जीवन समृध्द करण्यास खेळाचा पुष्कळ उपयोग होतो. ही गोष्ट आता स्पष्ट झाली आहे. खेळण्याची वृत्ती टाकाऊ नाही तर आवश्यक आहे. जर एखादया मुलांत ही वृत्ती नसेल तर त्यात काहितरी विकृती असते. त्यांचा शारिरीक व मानसिक विकास बरोबर होत नाही अस निष्कर्षि कादला जातो. यासाठी या शिक्षणात खेळाचा नीट उपयोग करुन घेतला तर मुले पुष्कळ गोष्टी सहज शिकतात. शिक्षण व खेळ यात विरोध नाही उलट खेळाचे तत्व शिक्षणात आणले तर शिकणे आणले तर शिक्षण सोपे व सुलभ होते व त्यातूनच बुध्दिविकास होण्यास मदत होते.